

# आजारी दुधाळ जनावरांची लक्षणे व उपाययोजना

दुग्धव्यवस्थापनामध्ये आजारी जनावर ओळखणे महत्त्वाचे ठरते. आजारी जनावर ओळखले तर वेळीच आपण योग्य उपाययोजना करु शकतो व आपले आर्थिक नुकसान टाळू शकतो. आजारी जनावरे शांत बसून राहतात. त्यांची हालचाल मंदावते. चेहरा पडलेला दिसतो. त्वचा निस्तेज होते. अंगावर बसलेल्या माश्या कातडीच्या हालचालीने अथवा शेपटीने उठवण्याची ताकद जनावरांमध्ये नसते. रोगी जनावरांची नाकपुडी बऱ्याचदा कोरडी आढळते. रवंथ करण्याची प्रक्रिया मंदावते. खाण्या-पिण्याची क्रिया मंदावते किंवा थांबते. दूध उत्पादन किंवा काम करण्याची क्षमता कमी होते. शेण व लघवीमध्ये नेहमीपेक्षा फरक जाणवतो. जनावरे थरथर कापतात. तोंडातून लाळ गळते. नाकातून, डोळ्यांतून पाणी येते. रोगी जनावरांच्या शरीराचे तापमान, श्वसन, हृदयाचे ठोके प्रमाणात नसतात.

**प्रतिबंधात्मक उपाययोजना :**

१) जनावरांना आरोग्यदायक, थंडी, ऊन, वारा, पाऊस यांपासून संरक्षण करणारा निवारा असावा. गोठा व संपूर्ण परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा. विशेष करून पावसाळ्यात जास्तीची खबरदारी घ्यावी. गोठ्यामध्ये दोन जनावरांत योग्य अंतर ठेवावे.

२) वातावरणातील बदलांचा जनावरांवर ताण येतो, त्यासाठी वेळोवेळी परिस्थितीनुसार व्यवस्थापनात बदल करत जावा. खाद्याच्या गव्हाणी नियमित स्वच्छ पाण्याने धुऊन घ्याव्यात. पाणी पिण्याचा हौद स्वच्छ धुऊन घेऊन त्याला चुना लावावा, त्यामुळे हौदात शेवाळ्याची वाढ होणार नाही. जनावरांच्या शरीराला सर्व अन्नघटक (पिष्टमय पदार्थ, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, तंतुमय पदार्थ, क्षार व जीवनसत्त्वे) योग्य प्रमाणात उपलब्ध होतील असा योग्य व संतुलित आहार पुरवावा.

३) दुभत्या जनावरांना मोकाट चरण्यासाठी सोडू नये. मोकाट, मुक्त पद्धतीने जनावरांचे संगोपन करत असताना ते कोणतेही अखाद्य वस्तू किंवा विषारी वनस्पतीचे सेवन करणार नाहीत याकडे लक्ष द्यावे. घटसर्प, फऱ्या, लाळ्या खुरकूत इ. रोगाविरुद्ध नियमित लसीकरण करावे.

४) जतूंचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी वर्षातून किमान दोनदा (पावसाळ्यापूर्वी व पावसाळ्यानंतर) जंतनाशक औषधे पाजावीत. पचन संस्थेचे विकार टाळण्यासाठी एकाच वेळी जास्त खाद्य न देता ते विभागून द्यावे, तसेच फक्त सुका किंवा ओला चारा न देता दोन्ही योग्य प्रमाणात द्यावा. जनावरांच्या अंगावरील व परिसरातील गोचीड, गोमाश्या यांचा प्रादुर्भाव नियंत्रित ठेवावा.

५) धार काढण्यापूर्वी व काढल्यानंतर कास व सड पोटॅशिअम परमँगनेटच्या पाण्याने स्वच्छ धुऊन कपड्याने पुसून घ्यावी. प्रजनन संस्थेचे विकार टाळण्यासाठी अनुभवी तज्ञांकडून योग्य वेळी तपासणी करून घ्यावी. दुभती जनावरे आटविल्यानंतर प्रत्येक सडात प्रतिजैविके सोडून घ्यावी.

६) गाभण जनावरांचा योग्य सांभाळ करावा, तसेच विताना व विल्यानंतर योग्य ती खबरदारी घ्यावी. वासराच्या जन्मापूर्वीपासूनच त्याच्या संगोपनाकडे लक्ष द्यावे. जनावरांतील विषबाधा टाळण्यासाठी बुरशीयुक्त चारा खाण्यास देऊ नये, तसेच कीटकनाशके, तणनाशके, खते, कोवळी ज्वारी, ज्वारी पिकाचे फुटवे, जवस, गायरानातील विषारी वनस्पती यांचा जनावरांशी संपर्क येणार नाही याची दक्षता घ्यावी. जनावरांना सर्पदंशापासून किंवा इतर प्राणी दंशापासून वाचविण्यासाठी अडचणीच्या ठिकाणी चरण्यास नेऊ नये.

७) वेळीच निदानासाठी, गरज भासल्यास रक्त, दूध, शेण व मूत्र यांची तपासणी करून घ्यावी, तसेच जनावर आजारी झाल्यास त्वरित पशुवैद्यकाच्या सल्ल्याने उपचार करून घ्यावेत. जनावरांची नियमित पशुवैद्यकिय तपासणी करुन घ्यावी.


प्रकाशन

**महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, संशोधन अनुदान अंतर्गत**

www.mafsu.in

www.knpcvs.in

✻ मार्गदर्शक ✻



**कर्नल प्रा. (डॉ.) ए. एम. पातुरकर**
मा. कुलगुरु, मपमविवि, नागपुर

**डॉ. एस. व्ही. उपाध्ये**
अधिष्ठाता, पशुविज्ञान विद्याशाखा,
मपमविवि, नागपुर

**डॉ. एन. व्ही. कुरकुरे**
संचालक संशोधन,
मपमविवि, नागपुर

**डॉ. ए. यु. भिकाने**
संचालक विस्तार शिक्षण,
मपमविवि, नागपुर

**डॉ. व्ही. डी. आहेर**
सहयोगी अधिष्ठाता
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

✻ संकलन ✻

**डॉ. स्मिता आर. कोल्हे**
संशोधन प्रकल्प प्रमुख, पशुवैद्यकीय व पशुसंवर्धन विस्तार शिक्षण विभाग
क्रांनापापवैम, शिरवळ, जि. सातारा

संपर्क : टोल फ्री क्रमांक : १८००-२३३-३२६८ सकाळी १० ते सायं. ६ वा.